# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०– २५६२११५६
२५६२११५७
२५६२११५८
२५६२११६३

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
गणेशखिंड, पुणे–४११ ००७
वेबसाइट : **www.unipune.ac.in**
इ–मेल - approval@unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीसीओ/ 3121

दिनांक : 26/09/2023

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य/ संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था
पुणे , अहमदनगर आणि नाशिक

विषय – सहयोगी प्राध्यापक पदाबाबात ...

संदर्भ – उच्च तंत्र शिक्षण विभागाचा ठराव क्र.एसपीसी–२०१०/(३४/१०)/टीई–२, मंत्रालय, मुंबई – ४०००३२ दिनांक २० ऑगस्ट,२०१०

महोदय/महोदया,

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांनी निर्गमित केलेल्या निकषांनुसार व निवड समितीच्या शिफारशीनुसार ज्या उमेदवारांना पाचव्या वेतन आयोगानुसार **सहायक प्राध्यापक** म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. अशा उमेदवारांनी ७ वर्षाच्या आत पीएच.डी उत्तीर्ण होण्याच्या अटीवर मान्यता देण्यात आलेल्या आहेत व त्यांची पीएच.डी पूर्ण होऊन तीन वर्ष झालेली आहेत अशा काही शिक्षकांनी **सहयोगी प्राध्यापक** म्हणून शिक्षक मान्यता मिळण्यासाठी खाली नमुद केलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने या विभागात अर्ज सादर केलेले आहेत.

उच्च तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक २० ऑगस्ट, २०१० रोजीच्या ठरावातील मुद्दा क्र. २ मध्ये खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

***"Incumbent Assistant Professor and Incumbent Lecturers (Selection Grade) who have completed 3 years in pre-revised pay scale of Rs. 12000- 18300 on 01/01/2006 shall be placed in pay band of Rs. 37400-67000 with AGP of Rs. 9000/- and shall be Re-designated as Associate Professor."***

उपरोक्त बाब विचारात घेता संबंधित महाविद्यालये/संस्थांनी आवश्यक असणारी खालीलप्रमाणे कागदपत्रे या विभागात सादर करावीत.

अ. संबंधित संस्थेच्या नावाचे पत्र (Covering Letter)

ब. संस्थेने गठीत केलेल्या किमान **दोन सदस्यांची समितीने शिफारस केलेल्या स्वाक्षरीचे स्पष्ट अहवाल** व त्यासोबत आवश्यक असलेली साक्षांकित असलेली कागदपत्रे खालीलप्रमाणे :–

१. संबंधित सेवकाचे प्रथम नियुक्तीचे पत्र

२. रूजू अहवाल

३. कायमस्वरूपी शिक्षक मान्यतापत्र

४. विद्यापीठाने पीएच.डी च्या अधिन राहून दिलेले मान्यतापत्र

५. संबंधित शिक्षकाचे पीएच.डी उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र

६. संबंधित शिक्षकाचे पीएच.डी ची अट काढून टाकल्याचे पत्र

७. संबंधित शिक्षकांचे सलग तीन वर्ष त्याच महाविद्यालयात सद्यस्थितीत शिकवित असल्याचे अनुभवाचे प्रमाणपत्र

८. भविष्यात याबाबत काही अर्थिक, न्यायालयीन बाब उद्‌भवल्यास त्याची सर्व जबाबदारी संस्थेची राहील अशा आशयाचे सचिव/अध्यक्ष यांच्या सहीचे हमीपत्र

तरी सर्व संबंधित महाविद्यालये / संस्थांनी वरील सर्व कागदपत्रे ही दिनांक १४/१०/२०२३ पर्यंत या विभागात सादर करावीत. मुदतीनंतर प्राप्त प्रस्तावांवर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

कळावे,

आपला

Rasve 21/9/2023

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव